# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of History

## Assignment

## Session: 2017 – 2018

Page No.
Date: / /

Name :- Vrukshali .D. Dhabarde

std :- 2nd year (4th sem)

Subject :- History Assingnment

College :- Yashoda girls Art's & Commorce College

Assignment Subject -

→ सुभाषचंद्र बोस आणि आझाद हिंद सेना।

2017 - 2018

SEAL
Yashoda Girls Arts & Commerce College • Nagpur

# 1. सुभाषचंद्र बोस आणि आझाद हिंद सेना।

## 1) प्रस्तावना :-

सुभाषचंद्र बोस यांचा जन्म जानेवारी 23, 1896 रोजी ओडिशा मधील कटक शहरात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जानकीनाथ आणि आईचे नाव प्रभावती होते. जानकीनाथ बोस हे कटक शहरातील नामवंत वकील होते आधी ते सरकारी वकील म्हणून काम करत होते. पण नंतर त्यांनी आपली स्वतःची वकिली सुरू केली होती. कटक महापालिकेत ते काही काळ काम करत होते. इंग्रज सरकारने तसेच बंगालचे विधानसभेचे सदस्य ही होते. इंग्रज सरकारने त्यांना रायबहादुर हा किताब दिला होता. प्रभावती व जानकीनाथ देवींच्या वडिलांचे नाव गंगानारायण दत्त होते. दत्त घराणे हे कोलकात्यातील एक श्रीमंत घराणे होते. प्रभावती व जानकीनाथ बोस यांना एकूण 14 मुले होती. त्यात 6 मुली व 8 मुलगे होते. सुभाषचंद्र त्यांचे सहावे अपत्य व पाचवे पुत्र होते. आपल्या सर्व भावांपैकी सुभाषला शरदचंद्र अधिक प्रिय होते. शरदबाबू हे प्रभावती व जानकीनाथ ह्यांचे दुसरे पुत्र होते. सुभाष त्यांना मेजदा म्हणत असत शरदबाबूंच्या पत्नीचे नाव विभावती होते.

SEAL

2) चरित्र :-

सुभाषचंद्र बोस हे भारतातील प्रसिद्ध स्वातंत्र्यसैनिकोपैकी एक होते. ते तरुणांवर एक करिश्माई प्रभावशाली होते. आणि स्वातंत्र्याच्या लढ्यात भारतीय राष्ट्रीय सैन्य (INA) ची स्थापना करुन त्यांचे नेतृत्व करुन "नेताजी" ही पदवी मिळवली. सुरुवातीला भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसशी जुळवून घेतले असले तरी विचारधारेतील मतभेदांमुळे ते पक्षाबाहेर फेकले गेले. भारतातून ब्रिटिशांना हुसकावून लावण्यासाठी त्यांनी दुसऱ्या महायुद्धात जर्मनीतील नाझी नेतृत्व आणि जपानमधील इम्पीरियल आर्मी यांची मदत घेतली. 1945 मध्ये ते अचानक गायब झाल्यानंतर, त्याच्या अस्तित्वाच्या शक्यतांबद्दल भिन्न सिद्धांत लोकप्रिय झाले.

पुर्ण नाव – सुभाष चंद्र बोस
जन्मतारीख – 23 जानेवारी 1897
जन्म ठिकाण – कटक, उडीसा
वडिलांचे नाव – जानकीनाथ बोस
आईचे नाव – प्रभाती देवी
पत्नीचे नाव – एमिली शेंकल
मुलीचे नाव – अनीता बोस

शिक्षण – रेनशॉ कॉलेजिएट स्कूल, कटक
(12 वी तक पढाई)
प्रेसीडेंसी कॉलेज, कलकत्ता
(दर्शनशास्त्र)
कॅम्ब्रिज विश्वविद्यालय, इंग्लैंड

राजकीय विचारधारा – राष्ट्रवाद साम्यवाद,
फॅसिझम प्रवृत्ती

राजकीय संघटना – भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस
फॉरवर्ड ब्लॉक
भारतीय राष्ट्रीय सेना

मृत्यु – 18 ऑगस्ट 1945

3) स्थापना :-
आझाद हिंद फौज ही भारतीय पारतंत्र्यांच्या काळात ब्रिटिशांशी लढण्यासाठी निर्माण केलेली भारताची सेना होती. तिचे नेतृत्व सुभाषचंद्र बोस यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या काळात केले होते. रासबिहारी बोस यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली. आझाद हिंद सेनेची स्थापना 1942 मध्ये झाली

Page No.
Date: / /

4) कार्ये :⇒

कोलकात्यातील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक देशबंधू चित्तरंजन दास यांच्या कार्याने प्रभावित झालेल्या सुभाषची, दासबाबू बरोबर काम करण्याची इच्छा होती. इंग्लंडहुन त्यांनी दासबाबूंना पत्र लिहुन त्यांच्याबरोबर काम करण्याची इच्छा व्यक्त केली होती.

रवींद्रनाथ ठाकूर यांच्या सल्ल्यानुसार भारतात परतल्यावर ते सर्वप्रथम मुंबईला जाऊन महात्मा गांधींनी भेटले. मुंबईत गांधीजी मणिभवन नामक वास्तू मध्ये वास्तव्य करत. तेथे जुलै 20, 1931 रोजी महात्मा गांधी सुभाषचंद्र बोस सर्वप्रथम एकमेकांना भेटले.

गांधीजींनी देखिल कोलकत्याला जाऊन दासबाबूंबरोबर काम करण्याचा सल्ला दिला. मग सुभाषबाबू कोलकत्याला आला व दासबाबूंना भेटले. दासबाबूंना त्यांना पाहून फार आनंद झाला. त्याकाळी, गांधीजींनी इंग्रज सरकारच्या विरोधात असहकार आंदोलन चालवले होते. दासबाबू बंगालमध्ये ह्या आंदोलनाचे नेतृत्व करीत होते. त्यांच्या बरोबर सुभाषबाबू ह्या आंदोलनात सहभागी झाले. 1922 साली दासबाबूंनी कॉंग्रेस

अंतर्गत स्वराज्य पक्षाची स्थापना केली. विधान-सभेच्या आतून इंग्रज सरकारला विरोध करण्यासाठी कोलकाता महापालिकेची निवडणूक, स्वराज्य पक्षाने लढवून जिंकली, स्वत: दासबाबू कोलकत्याचे महापौर झाले. त्यांनी सुभाषबाबूंना महापालिकेचे प्रमुख कार्यकारी अधिकारी बनवले. सुभाषबाबूंनी आपल्या कार्य-काळात महापालिकेची काम करण्याची पद्धतच बदलुन टाकली. कोलकत्यातील रस्त्यांची इंग्रज नावे बदलुन त्यांना भारतीय नावे दिली गेली. स्वातंत्र्यलढ्यात प्राणार्पण केलेल्या क्रांतिकारकांच्या कुटुंबियांना महापालिक नोकरी मिळू लागली.

लवकरच, सुभाषबाबू देशातील एक अग्रेसर युवा नेता म्हणून ओळखले जावू लागले. पंडित जवाहरलाल नेहरूंसह, सुभाषबाबूंनी काँग्रेस अंतर्गत इंडिपेंडन्स लिगची स्थापना केली. 1928 साली जेव्हा सायमन कमिशन भारतात आले तेव्हा काँग्रेसने त्याला काळे झेंडे दाखविले होते. कोलकात्यात सुभाषबाबूंनी ह्या आंदोलनाचे नेतृत्व केले. सायमन कमिशनला उत्तर देण्यासाठी काँग्रेसने भारताच्या भावी घटनेचा आराखडा तयार करण्यासाठी आठ सदस्यांची समिती नेमली. पंडित मोतीलाल नेहरू ह्या समितीचे अध्यक्ष

होते तर सुभाषबाबू त्याचे एक सदस्य ह्या समितीने नेहरु रिपोर्ट सादर केला.

1928 साली कॉंग्रेसचे वार्षिक अधिवेशन पंडित मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली कोलकात्यास झाले. ह्या अधिवेशनात सुभाषबाबुंनी खाकी गणवेश, घालून, पंडित मोतिलाल नेहरूंना लष्करी पद्धतीने सलामी दिली. गांधीजी त्याकाळी पूर्ण स्वराज्याच्या भूमिकेशी सहमत नव्हते. ह्या अधिवेशनात त्यांनी इंग्रज सरकारकडून वसाहतीचे स्वराज्य मागण्यासाठी ठराव मांडला. मात्र सुभाषबाबू व पंडित जवाहरलाल नेहरू योना पूर्ण स्वराज्यच्या भूमिकेशी तडजोड मान्य नव्हती, शेवटी वसाहतीचे स्वराज्याची मागणी मान्य करण्यासाठी इंग्रज सरकारला एक वर्षाची मुदत देण्याचे ठरले. जर एका वर्षात इंग्रज सरकारने ही मागणी मान्य केली नाही. तर कॉंग्रेस पूर्ण स्वराज्यांची मागणी करेल असे ठरले. इंग्रज सरकारने कही मागणी मान्य केली नाही. त्यामुळे 1930 साली कॉंग्रेसचे वार्षिक अधिवेशन पंडित जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली महोत्सव झाले. तेव्हा असे ठरवले गेले की जानेवारी 26 हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून पाळला जाईल.

जानेवारी २६, १९३१ च्या दिवशी, कोलकत्यात सुभाषबाबू तिरंगी ध्वज फडकावत एक विराट मोर्चाचे नेतृत्व करत होते. तेव्हा पोलिसांनी केलेल्या लाठी हल्ल्यात ते जखमी झाले. सुभाषबाबू तुरुंगात असतांना गांधीजींनी इंग्रज सरकार बरोबर तह केला व सर्व कैद्यांची सुटका करण्यात आली परंतु सरदार भगतसिंग आदि क्रांतिकारकांची सुटका करण्यास इंग्रज सरकारने नकार दिला. भगतसिंगाची फाशी रद्द करावी ही मागणी गांधीजींनी इंग्रज सरकारकडे केली. सुभाषबाबूंची इच्छा होती, की याबाबतीत जर इंग्रज सरकार दाद देत नसेल, तर गांधीजींनी सरकारबरोबर केलेला करार मोडावा. पण आपल्या बाजुने दिलेला शब्द मोडणे गांधीजींना मान्य नव्हते इंग्रज सरकारने आपली भूमिका सोडली नाही व भगतसिंग त्यांच्या साथीदारांना फाशी देण्यात आले भगतसिंगाना वाचवू न शकल्यामुळे सुभाषबाबू, गांधीजी व कॉंग्रेसच्या कार्य-पद्धतीशी फार नाराज झाले.

२२ जुलै 1940 रोजी मुंबई येथे सुभाषचंद्र बोसांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी भेट झाली होती. दोघांमध्ये देशाचे स्वातंत्र्य आणि देशातील जातीयता व अस्पृश्यता यावर चर्चा झाली.

## 5) आझाद हिंद सरकार :-

त्यास सुमारास इ.स. 1941 जपानने महायुद्धात भाग घेतला. जर्मनीकडून विशेष साथ मिळत नाही. हे दिसून आल्यावर सुभाषबाबूंना आशियात येण्याची ओढ लागली फेब्रुवारी 1943 मध्ये समुद्रपुलाखालून जाणाऱ्या एका जर्मन यु पाणबुडीत बसून त्यांनी जर्मनी सोडली जर्मनीपासून जपानला येण्यास त्यांना 93 दिवस लागले. त्यांच्याबरोबर अबीद हसन हे त्यांचे सहकारी होते. त्यावेळी 'माट्डा' हे सांकेतिक नाव त्यांनी घेतले होते. 6 मे. 1943 रोजी ते दोघे 'सैबान' येथे पोहोचले.

सुभाषबाबू जपानला येण्यापूर्वीच रासबिहारी बोस यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली होती (1942) सुभाषबाबू जपानला येण्यापूर्वीच रासबिहारी बोस यांनी आझाद हिंद सेनेची जपानी सैन्यातील अधिकारी मेजर फुजिवारा यांची भेट घेतली सुरुवातीला जपानच्या ताब्यात असलेल्या 10,000 भारतीय सैनिकांवरील अधिकाऱ्यांची जबाबदारी कॅ. मोहनसिंग यांनी घेतली. ते कर्नल ए.सी. चटर्जी हे कर्नल जगन्नाथराव भोसले, ले. कर्नल निरंजनसिंग गिल

Page No.
Date: / /

इत्यादींना। इंडियन नॅशनल आर्मीची स्थापना केली, रासबिहारी बोस व कॅ- मोहनसिंग यांनी स्पष्ट केले की, सुभाषबाबू जपानमध्ये आपल्या आझाद हिंद सैनिकांना पाठविलेल्या पत्रात सुभाषबाबू म्हणाले,

" भारत स्वतंत्र झाला आहे हे पाहण्यास आपण जिवंत असू वा नसू, हा माझ्या दृष्टीने मुळीच महत्वाचा प्रश्न नाही; भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील आपली भूमिका आपण तन - मन - धन अर्पण करुन पार पाडली. हे आपले समाधान फार मोठे आहे, आणि ते कुणीही हिरावून घेऊ शकणार नाही".

6) आझाद हिंद सेनेचे मुल्यमापन :-

1940 च्या दशकात भारताबाहेर ब्रिटिश राजवटीपासुन भारताला मुक्त करण्या- साठी अक्ष शक्तींशी संबंध ठेवण्याच्या उद्देशाने सुरु झालेल्या राजकीय चळवळीचा हा एक भाग होता. सिंगापुरमध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या उत्तरार्धात भारताच्या निर्वासित राष्ट्रवाद्यांनी शाही जपानच्या आर्थिक, लष्करी आणि राजकीय सहाय्याने त्याची स्थापना केली होती. 1 सप्टेंबर 1942 रोजी स्थापन झालेले, सरकार सुभाषचंद्र बोस यांच्या संकल्पनांनी

प्रेरित होते जे सरकारचे नेते आणि राज्याचे प्रमुख देखील होते. सरकारने आग्नेय आशियाई ब्रिटिश वसाहती प्रदेशातील भारतीय नागरी आणि लष्करी कर्मचाऱ्यांवर अधिकार घोषित केला आणि जपानी सैन्याने भारताकडे केलेल्या आक्रमणादरम्यान भारतीय भूभागावरील संभाव्य अधिकार जपानी सैन्य आणि भारतीय राष्ट्रीय सैन्याच्या हाती पडण्याची शक्यता आहे. आझाद हिंद सरकारचे स्वतःचे चलन, न्यायालय आणि नागरी संहिता होती आणि काही भारतीयांच्या दृष्टीने त्याच्या अस्तित्वाने ब्रिटिशांविरुद्धच्या स्वातंत्र्यलढ्याला अधिक महत्व दिले. जपानने 1943 मध्ये जपानी ताब्यात घेतलेल्या अंदमान आणि निकोबार बेटांचे नाममात्र अधिकार सुपूर्द केले, तरीही सरकार जपानी समर्थनावर अवलंबुन राहिले. तात्पुरत्या सरकारच्या स्थापनेनंतर लगेचच, स्वतंत्र भारताने इंडो-बर्मा आघाडीवर मित्र राष्ट्रांच्या सैन्याविरुद्ध युद्ध घोषित केले. त्याचे सैन्य, भारतीय राष्ट्रीय सेना (आझाद हिंद फौज), इंफाळ-कोहिमा सेक्टरमध्ये इंपीरियल जपानी सैन्याचा भाग म्हणुन ब्रिटिश भारतीय लष्कर आणि सहयोगी सैन्याविरुद्ध कारवाई करत होते. INA ची पहिली मोठी व्यस्तता इम्फाळच्या लढाईत होती, जिथे

जपानी वंशाच्या सैन्याच्या नेतृत्वाखाली, त्यांनी कोहिमामधील ब्रिटिश संरक्षणाचा भंग केला, मित्र राष्ट्रांच्या सैन्याने आपत्तीजनक पराभव होण्याआधी मोइरांगच्या मुख्य भागापर्यंत पोहोचले, आणि मित्र राष्ट्रांच्या हवाई वर्चस्व आणि तडजोड पुरवठा ओळी जपानी आणि INA दोघांनाही माघार घेण्यास भाग पाडले. आझाद हिंदचे अस्तित्व मूलत: भारतीय राष्ट्रीय सैन्याच्या अस्तित्वाशी विपरित होती. युद्धाच्या समाप्तीपर्यंत अंदमान बेटांचे नागरी प्रशासन ब्रिटिशांच्या अधिकारक्षेत्रात परत येईपर्यंत सरकार स्वत: चालू असताना, आझाद हिंदची मर्यादित शक्ती रंगूनमधील INA सैन्याच्या शेवटच्या मोठ्या तुकडीच्या आत्मसमर्पणाने प्रभावीपणे संपुष्टात आली. बोस यांच्या मृत्युला संपूर्ण आझाद हिंद चळवळीचा अंत म्हणून पाहिले जाते.

आझाद हिंदचा वारसा मात्र निर्णयासाठी खुला आहे. युद्धानंतर, राजने आझाद हिंदच्या कल्पनेचे देशद्रोही आणि सहयोगी यांच्याकडून 'देशभक्तांमध्ये श्रेष्ठ" असे झालेले परिवर्तन पाहिले. भारतभर पसरलेल्या उग्रवादी राष्ट्रवाद आणि त्यातून प्रेरित संताप आणि उठाव लक्षात घेता, ब्रिटिश

धरण्यासाठी व प्रत्यक्ष संघर्षाला सामोरे जाण्यासाठी देशाचे लष्करीकरण करणे आवश्यक आहे या भावनेत वाढ होऊन लष्करीकरणातून पहिले महायुद्ध उद्‌भवले

4) गुप्त राजकारण :- आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार एखादा देशांनी दुसऱ्या देशांशी केलेला करार आंतरराष्ट्रीय समुदायासमोर प्रसिद्ध करणे आवश्यक असते. परंतु या काळात युरोपात गुप्ततेचे वर्चस्व होते. बिस्मार्क तर गुप्त राजकारणाचा शिल्पकार मानला जातो. बिस्मार्कने फ्रांसला आंतरराष्ट्रीय राजकारणात एकाकी पडण्याकरिता आस्ट्रीया - हंगेरी - इटली असा त्री-राष्ट्र करार केला. परिणामतः फ्रान्स व इंग्लंडने आपले शत्रुत्व बाजूला ठेवून जर्मनविरोधात मैत्री करार केला. गुप्त राजनितिमुळे युरोपात साशंकता व भिती चे वातावरण निर्माण झाले. परिणामत युरोपात अस्थिरता निर्माण होऊन जग महायुद्धात लोटल्या गेले.

5) आंतरराष्ट्रीय संघटनेचा अभाव :- या काळात देशादेशांमधील समस्या चर्चेद्वारे सोडवून युद्धाला आवर घालणारी कोणतीही आंतरराष्ट्रीय संघटना अस्तित्वात नव्हती. प्रत्येक देश आपली मनमानी करीत होता. गुप्त करारावर नियंत्रण ठेवण्यात आंतरराष्ट्रीय कायदा अस्तित्वात आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनेची आवश्यकता होती. युद्ध सुरू होण्यापूर्वी इंग्लंडने फ्रांसला नेमकी कोणती आश्वासने दिली होती हे कॉमन्स सभेला सांगण्यात आले नव्हते. तसेच इटली हा त्री-राष्ट्र गटाचा सदस्य होता तरीही त्याने १९०२ मध्ये फ्रांसबरोबर व १९०९ मध्ये रशियाबरोबर वेगवेगळे गुप्त करार केले होते. इटलीच्या या वर्तनावर कारवाई करणारी कोणतीही संघटना अस्तित्वात नसल्याने जग पहिल्या महायुद्धात ओढल्या गेले.

6) आर्थिक वसाहतवाद :- आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेच्या नावाखाली युरोपातील बड्या राष्ट्रांनी आपला साम्राज्य विस्तार करण्यास प्रारंभ केला. यातूनच जगाच्या पाठीवर ब्रिटिशांचे साम्राज्य सर्वात्रलवपणे पसरले. अशा साम्राज्यात इंग्लंडच्या मत्सर करणाऱ्या राष्ट्रांनीही आपल्या देशाच्या प्रादेशिक सीमा वाढविण्यासाठी

SEAL

योजना तयार केल्या. त्यामुळे परस्पर शेजारी असलेल्या राष्ट्रामध्ये स्पर्धा सुरू झाली. युरोपमधील लहानमोठ्या राष्ट्रांनी आशिया व आफ्रिका खंडात वसाहती मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. वसाहतीमुळे देशांची आंतराष्ट्रीय प्रतिष्ठा सहज साधता येणार होती तसेच वसाहतीतून कच्चा माल पुरविणे. तेथील बाजारपेठेत आपल्या कारखान्यातील पक्का माल विकणे, वसाहतीमध्ये आपल्या देशातील लोकांचे स्थलांतर करणे. स्थलांतरीत वसाहतून अतिशय कमी दरात श्रमशक्ती वसाहतीतून अतिशय कमी उपलब्ध होत असल्याने कारखानदारांनी अमाप नफा मिळत होता. या संधीचा फायदा घेण्यासाठी इंग्लंड, फ्रान्स, इटली, जर्मनी, जपान, फ्रान्स, रशिया, ऑस्ट्रिया, हंगेरी, डेन्मार्क, स्पेन, पोर्तुगाल आणि अमेरिका या राष्ट्रांनी एकच गर्दी केली वसाहती जिंकण्याकरिता स्पर्धा सुरू झाली. ती स्पर्धा युध्दाची पार्श्वभूमी तयार करण्यास कारणीभूत ठरली.

7) आक्रमक साम्राज्यवाद :- साम्राज्यवादी देशांची साम्राज्यविस्ताकरिता असलेली परस्पर स्पर्धा प्रथम महायुध्दाचे मह -

त्वपूर्ण कारण मानले जाते इंग्लंडमध्ये औ-
द्योगिक क्रांती झाल्यामुळे वस्तुच्या उत्पाद-
नात प्रचंड वाढ झाली इंग्लंडनंतर फ्रांस
इटली, प्रशिया ही राष्ट्रे उद्योगशील बनली.
त्यासाठी कोळसा, लोखंड, कापूस, रबर, इ-
त्यादी कच्चा मालाची आवश्यकता व
मालाचा सतत पुरवठा, पक्का माल वितरित
करण्यासाठी बाजारपेठांची आवश्यकता व
मालाचा सतत पुरवठा युरोपियन राष्ट्रांनी
आपले लक्ष नैसर्गिक साधनांनी समृद्ध
अशा आशिया व आफ्रिका खंडाकडे
वळविले. ह्यातुन आर्थिक साम्राज्यवाद,
निर्माण होऊन वसाहती मिळविण्याकरिता
स्पर्धा निर्माण झाली इंग्लंड, फ्रान्स, रशिया.
जर्मनी, इटली, आस्ट्रीया, रशिया, जर्मनी,
इटली, आर यासारखी जवळपास सर्वच
युरोपियन राष्ट्रे साम्राज्यस्पर्धेत सहभागी
झाल्याने वसाहतीवरून त्यांच्यात संघर्ष नि-
र्माण होते. इंग्लंड, फ्रांस, रशीया या
देशांनी आशिया, आफ्रिका, ऑस्ट्रीया खंडात
आपापल्या वसाहती निर्माण करून त्यावर
अधिकार प्रस्थापित केलेला होता. जर्मनी
व इटली वसाहतवादाचा स्पर्धेत उशिरा
उतरल्याने त्यांच्या साम्राज्यविस्ताराची शक्यता
कमी होती त्यामुळे या देशांनी दुसऱ्या
राष्ट्राच्या वसाहतीवर बलपुर्वक अधिकार
प्रस्थापित करून आपली स्थिती मजबुत

बनविण्याची साम्राज्यवादाच्या विस्ताराची नवी नीति अवलंबिली.
प्रथम महायुध्दाच्या आरंभापूर्वी जर्मनीची आर्थिक व औद्योगिक स्थिती अत्यंत मजबूत झाली होती साम्राज्य विस्ताराच्या स्पर्धेचे पर्यवसन पहिल्या महायुध्दात झाले.

८) युरोपचे दोन गटात विभाजन :- जर्मन चॅन्सलर बिस्मार्कने जर्मनीचे एकीकरण करण्यासाठी फ्रांसच्या विरोधात अनेक परस्परविरोधी आंतरराष्ट्रीय करार केले त्यामध्ये जर्मन- ऑस्ट्रिया आणि इटली ह्या राष्ट्रांमध्ये त्रिराष्ट्र करार झाला. अशाप्रकारे प्रभावी साधन आंतरराष्ट्रीय समतोल राखण्यासाठी अंमलात आणला. बिस्मार्कनंतर त्रिराष्ट्र मैत्री कराराला प्रत्युत्तर देण्यासाठी युरोपमध्ये रशिया, फ्रान्स व इंग्लंड या राष्ट्रांनी आपसात सहकार्य करण्यास सुरुवात केली. अशा प्रकारच्या सहकार्यामधुनच इ. स. १८९३ मध्ये फ्रान्स - रशियात मैत्री करार, इ. स १९०४ मध्ये इंग्लंड फ्रान्समध्ये मैत्री करार आणि १९०७ मध्ये इंग्लंड - रशिया मैत्री करार झाला. अशा प्रकारच्या मित्र संघालाच त्रिराष्ट्र

मित्र संघ असे म्हटले जाते या दोन जागतिक करारांमुळेच युरोपमध्ये दोन गट पडले हे दोन्ही गट तुल्यबळ असल्यामुळे एकमेकांवरील आक्रमणाच्या भीतीने दोन्ही गटांनी शस्त्रास्त्रांची जमवाजमव करण्यास सुरूवात केली यामुळेच संपूर्ण युरोपचे दोन गटांमुळे विभाजन होऊन जगाची परिस्थिती युध्दासाठी अनुकूल बनली

9) तत्कालीन कारण :- अशाप्रकारे युरोपात प्रचंड तणावाचे वातावरण असतांना एक भयंकर घटना घडली व त्याच्या ठिणगीने युध्दाचा भडका युरोपात निर्माण झाला. आस्ट्रीया व सर्बिया यांच्यातील संबंध इ. स. 1908 ते 1914 या काळात पूर्णपणे बिघडले 28 जुन 1914 रोजी सर्बियातील काही अतिरेकी संघटनानी आस्ट्रीयाच्या राजपुत्र आर्चड्युक फ्रांसीस फर्डिनंड व त्यांची पत्नी बोस्निया प्रांताची राजधानी सॅरेजेव्हो येथे गेले असतांना त्यांची हत्या करण्यात आली. या खुनामागे सर्बिया असल्याची बाब पुढे येताच आस्ट्रीयन सरकारने सर्बियाला खुनास जबाबदार ठरवून सर्बियावर आक्रमण केले. अशारीतीने पहिल्या महायुध्दास सुरूवात झाली.

Page No. ____
Date: / /

10) मूल्यमापन :- १९१४ ते १९१८ यादरम्यान युरोपमध्ये हे युध्द सुरू झाले. एका बाजूला इंग्लंड - फ्रान्स - रशीया हा मित्र-गट तर दुसऱ्या बाजूला जर्मनी - आस्ट्रीया - हंगेरी आणि तुर्कस्थान यासारखे बलाढ्य राष्ट्रे होती पहिल्या महायुध्दाची कारणे मुद्द्यानुसार स्पष्ट केले आहे. इंग्लंड- फ्रान्स- रशीया या-च्याविरूध्द आस्ट्रिया - जर्मनी असे गट निर्माण झाले. इ. स 11 नोव्हेंबर 1918 रोजी पहिले महायुध्द समाप्त झाले.

SEAL

Principal
Yashoda Girls Arts & Commerce College, Sneh Nagar, Nagpur-15